## विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या यादयांबाबत सर्वसाधारण सुचना

१. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या माहितीची, कागदपत्रांची पडताळणी अथवा तपासणी न करता उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत/ शारिरीक व व्यावसायिक चाचणी करीता बोलविण्यात येणार असून ऑनलाईन अर्जात नमुद केलेली माहिती व जाहिरांतीत नमुद अटी व शर्तीच्या अधीन राहून त्यासंबंधीची कागदपत्रे/ प्रमाणपत्रे भविष्यात कागदपत्रे पडताळणी समितीव्दारे करण्यात येईल. पडताळणी समितीस संबंधीत मुळ कागदपत्रे सादर करून अर्जातील माहिती सिध्द करण्याची जबाबदारी संपूर्णतः उमेदवाराची राहील.

२. अर्जातील नमुद माहिती उमेदवार सिध्द न करू शकल्यास अथवा ती खोटी आढळल्यास, भरती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यात उमेदवाराची उमेदवारी रदद् करण्यात येईल. याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

३. सदर यादी तात्पुरती असून, ती पदभरतीच्या जाहिरांतीमध्ये दिलेल्या पात्रतेसंबंधीच्या तसेच उमेदवाराचा व्यक्तीगत तपशिल जसे- वय, शैक्षणिक गुणवत्ता, मुळ प्रमाणपत्र इत्यादींची पडताळणी केल्याशिवाय प्रसिध्द करण्यात येत असल्याने, सदर यादींमध्ये संपूर्ण अर्जदारांचा समावेश असून यादीत नाव असणे म्हणजे नियुक्तीबाबतची हमी नाही.

४. विद्यापीठाव्दारे प्रकाशित तीनही जाहिरातींमधील पदे ही केवळ डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला या प्रकल्पाव्दारे बाधित प्रकल्पग्रस्तांकरीता विशेष भरती करण्याकरीता प्रकाशित करण्यात आली आहे. त्यामुळे इतर प्रकल्पाव्दारे बाधित उमेदवार ऑनलाईन परीक्षेत/ शारिरीक व व्यावसायिक चाचणी मध्ये गुणतालीकेमध्ये अग्रस्थान प्राप्त केले तरीही सदर उमेदवार हा नियुक्तीस अपात्र आहे. याची नोंद घ्यावी.

५. शासन निर्णय दिनांक १९ मे, २०२५ मधील तरतुदी नुसार केवळ डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाच्या आस्थापनेवर प्रदीर्घ काळ रोजंदारी तत्वावर कार्यरत असलेल्या प्रकल्पग्रस्त मजुरांकरिता, विद्यापीठाकडून संदर्भाधीन शासन निर्णयानुसार राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पग्रस्तांकरिताच्या विशेष भरती मोहिमे अंतर्गत उच्चतम वयोमर्यादेची अट शिथील करण्यात आली आहे. त्यामुळे या विद्यापीठा व्यतीरिक्त इतर कुठलाही अनुभव वयोमर्यादेच्या शिथीलीकरणाकरीता ग्राहय धरल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

मा. अध्यक्ष, 'क' व 'ड' वर्ग निवड समिती व क.स.स./व.सं.स. निवड मंडळ तथा संचालक संशोधन, डॉ. पं.दे.कृ.वि.,अकोला यांच्या मान्यतेने.

अकोला
दिनांक : ०५ ऑगस्ट, २०२५

**स्वाक्षरीत/-**
कुलसचिव,
डॉ. पं.दे.कृ.वि.,अकोला